
# कादोडी

नाताळ २५ डिसेंबर २०२०

नववा वहरी एकून १६ वॉ अंक

( खाजगी वितरण)



# कादोडी

## नाताळश्या हनाव विशेषांक

२५ डिसेंबर २०२०

नववा वहरी

एकून सोळावॉ अंक

खाजगी वितरन

---

## या अंकात .......


संपादकीय
पनशळ ओडोडी पन... - जोसेफ तुस्कानो
भय - क्लेमेंट डिमेलो
भिजविलॅ ताहा.... - हेडविजेस रुमाव
आठोन - विजू वाज
जिगाळा माला देव भॅटातॅ - बॅप्टिस्ट एम वाझ
गावठी वालाआ हिंगाई... - पायस तुस्कानो
डुकरा मटन आन राजकारनी – फ्रँक मिरांडा
पेटुल्यासा तांबडा लुगडा – सॅबी परेरा
एक ऑथॉ बाबा.....!! – संगीता वाझ
मींगेल कॉपात तुमश्या... – राजन डिमेलो
पृथ्वी संरक्षन काळाई गरज - ब्रिनल कुडेल


**संपर्क / अभिप्राय :-** आमश्या हरी संपर्क कऱ्याकरतान नातॅ आपला या अंकाविषयीसा मत, संपादक मंडळाश्या कुनालाही भॅटॉन जरूर कळवा.


**संपादक**

ख्रिस्तोफर रिबेलो (९८१९४३६०७८)

**सहसंपादक**

एडवर्ड डिसोजा सुनील बा. डिमेलो

**संपादक मंडळ**

सायमन रॉड्रिग्ज, तेरेजा डिसोजा, जेम्सन डिमेलो, डॅनियल मस्करणीस, रॉबर्ट फर्नांडिस, राजन डिमेलो, रॉबिन्सन डिमेलो, वॉल्टर तुस्कानो, सिरील मिनेझीस

**मुखपृष्ठ :-** पॉल डिमेलो, गास

**Email :-** kadodivasai@gmail.com

**Web :- www.kadodi.in**


या अंकात प्रसिद्ध जालॅल्या मताशी संपादक मंडळ सहमत हायदॅस आहा नाय.

**सूचना:-** 'कादोडी' या अंकात तुमाला लेख, कविता आहा कय द्यासा हायदॅ तॅ **kadodivasai@gmail.com** याओरती धाडा नातॅ संपादक मंडळाला भेटा.

जकलॅ जाहिरातदार, देनगीदार तहॅस बरा-वाईट मत देनाऱ्या जकल्या कुपारी लॉकांअॅ आमॅ खूप आभार मानत्याव.
**नाताळसॉ हन सब्बान कुपाऱ्यांना खुब आनंदाव आन मजॅऑ जाओ अह्यो शुभेच्छा.**

# आबार

मंडळी, यंदा आपुन यो अंक ऑनलाइन प्रकाशित कॅलॅ, पन गेले नव वहरे जाले आपल्या आखख्या पंचक्रोशीत घराघरात या अंकायी वाटनी करनाऱ्याये आबार मानना आमसा कर्तव्य हाय. **खुब खुब आबार, दोस्त लोक....**

युवक वाचनालय (भुईगाव), विवियन डाबरे (जोहोडी), रॉयल डिमेलो (ओलोटी, गास), नितिन डाबरे, साहिल दोडती (निर्मळ), रूपेश रॉड्रिग्ज (दारसेंग), रोनाल्ड गोम्स (गोम्सआळी), संजय आल्मेडा (वंडा), सुनिता फर्नांडिस (मर्देस), रेन्सली निग्रेल (भागाळी), डायना दिब्रिटो (पोंडा), अनिल डाबरे (अक्करवाडी), मिल्टन रिबेलो (नानभाट), फ्रँक डॉ. मिरांडा (उमराळे), अॅलन व रॉबिन रॉड्रिग्ज (राजोडी), एलायस रॉड्रिग्ज (बोळींज), सचिन मेंडिस (जापके), ग्लोरिटा परेरा (घोसाळी), जॉन्सन दिब्रिटो (उंगनभाट-वाडी), कॉलिन मचाडो(मशाद), बेंजामिन केदारकर (केदार), साविन तुस्कानो (घोटकाल), रॉजर रॉड्रिग्ज (परसाव-पेडी), डॅनियल कोरिया (खोडाळे), अंद्रू सर (लालोडी-बावखाल), रॅकमन लोपीस (रुमाव-बानभाट), रूबन डिमोन्टी (मेढे), कोशाव मॅडम (नोनोडी), सिल्वॉन व निक्सन डिमेलो (वटार-थोंटेभाट), जिमी मोरो (जेलाडी), मायकल डिक्रुझ (सत्पाळा-घोटार), आलेक्स कोरिया (नांदान), ग्रेगरी लोपीस (पडई), वॉल्टर तुस्कानो (मेदोडी-तोरभाट-वडखांब), नितीन घोन्सालवीस (खिवनी), मेल्विना लोपीस(शिरलयवाडी)

गेले आठ वहरे एक रुपय पन न घॅता दर वहारा आमाला मुखपृष्ठ बनवोन देणाऱ्या '**पॉल डिमेलो**'शे खास खास आबार.

# संपादकीय

जकल्यांना नाताळश्या हनायो खुब खुब सुबेछा.

मंडळी, करोना महामारीश्या या काळात आपलॉ परत नाताळसॉ हन आलॅ. दर वहरापेक्षा यंदासॉ हन वॅगळॉ हाय. हन साजरॉ करताना खूब कय गोष्टी घडल्यात त्यायी आठोन करना जरूरी हाय, या ओड्या दिहात लॉकायो नोकऱ्यो गेल्यो. कायिक घरशे आपले जिवाभावाशे माहने आपल्यातनॅ निगॉन गेले. मार्च मयन्या तिहऱ्या आठवड्यापासून आपुन जकले ॲका वॅगळ्या जगात गेल्याव आहा वाटातॅ, यी वहरी आपल्या आयुष्यात आला नसता, तॅ बरा जालॉसा अही परिस्थिती ओथी, त्या टायमाला जकला बंद जाल्ता. अस्तॅ अस्तॅ मंग सुरू जाला. यात विशेष बाब मंजॅ जकले घरात बंद असताना जे आपली जबाबदारी पार पाड्या करता बार पडले, ते डॉक्टर, नर्सेस, पोलिस आन महानगर पालिका कामगार व त्यास जोडीला इतर स्वयंसेवक याये आबार आन खास करॉन आपल्या समाजाश्यो नर्सेस ज्यो आठवडो-पंदरा दी घरा नाय आल्यो, त्यांना कुपारी सलाम.

लस कतॅ येदॅ आन पयल्याहारके दी कतॅ येद्यात यायी वाट बगीत बॅहन्यात कय अर्थ नाय. या काळात एक गोष्ट बरी जाली. ती मंजॅ आपला लोक वेगवेगळ्या धंद्यात उतारला. ताहा बगीला तॅ करोनाने वाईट दी हाडले पन जोडीला एक नवी सुरुवात आपल्याला कऱ्याशी संधी दिले. बजार बंद असताना आपलॉ भाजीपालॉ, फळे, फुले आपल्या लोकांत ऱ्या लागले आन सोशल मीडिया वापर करॉन इतर लोकांपोत पोसवीलॉ. त्यासबरबर ज्यो गोष्टी गुजराती-मारवाडी आन भैय्यादरनॅ घेतोतॅ त्यो गोष्टी आते आपल्यास आपल्यास माहनादरनॅ मिळया लागल्यो. यात खास गोष्ट अही की आपल्या हिकलॅल्या तरुण मंडळीनॅ नवनवीन प्रकारशे बिझनेस काडल्यात.

मंडळी, आपल्याला एक आवाहन हाय, आपुन आपल्या समाजाश्या लॉकांना त्यांश्या बिझनेसमिनॅ मदत कऱ्या पाय, जोडा शक्य हाय आन गरजेआ हाय, ता सामान आपल्यास लॉकादरनॅ विकत घ्या, जॅनॅ आपलॉ पैसॉ आपल्यास समाजात खॅळतॉ रॅदॅ. पुडॅ पुडॅ नोकऱ्यो कमी हॉनार हात. आपले पोरे नवीन कय सुरू करॉन वॅगळॉ मार्ग पतकारत्यात हायद्यात, तॅ त्यांना पुडॅ यादो मदत करना यी आपला कर्तव्य हाय. दोन-शार रुपयाश्या फायद्याकरता आपुन बी कडे जाना यी बरबर नाय.

कादोडी अंकातनॅ आपली भाशा जगव्याकरता प्रयत्न कर्त्यावुस पन दरवाहरा आपल्या समाज्याआ भलॅकरता एक बरॉ विसार पन देत्याव. एक कुपारी समाज आपुन जकले सोबत रॅवॉन पुडॅ जाऑ.

# पनशाळ ओडोडी पन वार्ता जाम बोठी !!

**- जोसेफ तुस्कानो, बोरीवली**

शाळीआ दीहापासून बारकुशी पनशाळ आपली मैतरीनीघतीनुस आहातॅ. तिला आपुन दप्तरामीनश्या कंपास-पेटीमीनॅ खोड-रबर आन टोकिल्या हरी (शार्पनर) जपॉन ठवित्याव. ती आपल्याला अक्षरे गिरव्यादो मदत करतॅ. तिआस मदतीनॅ आपुन आपल्या शिक्षनाव पायॉ घालतॅव. जॅना शीत्रे काड्यादो आवड्यातॅत तॅई तर ती घनीस लाडकी. पनशळीला पयलॉ वायलॉ कम्प्युटर पन हांगता येदे. तीआ टॉक print करतॅ. तीऑ खोडरबर delete करतॅ आन शार्पनऱ refresh करतॅ.

पॉरांदो तॅ अह्या ह्या बारकुल्या पनशळीत ५ गोष्टी दड्लेल्यो अहत्यात.

१. पनशळ आपलॅला खास आठोन करॉन देतॅ गा तुमश्या मीनॅ जाम ताकत हाय. आन त्यास ताकतीतनॅ एक अज्ञात शक्ती बोठी कलाकृती निर्मान करतॅ. त्या 'परमिसर' या नावा ताकतीई आठोन ठवा.

२. पनशळीआ टॉक एक हारका घव्या लागातॅ. तिला वेदना हवातॅ हायद्यात, पन तीपासून वळानदार अक्षर आन शित्रे निर्मान हवात्यात. चांगला माहनू हव्यादो, पयली दु:ख-वेदना सहन कर्याशी आपली तयारी अहली पाय.

३. पनशळीनॅ लिवताना चुक हवू शकातॅ, पन ती, खोड-रबर वापरॉन आपलॅला त्यो सुको दुरुस्त कऱ्याशी संधी देतॅ. याऑस अर्थ आपून आपल्यो सुको दुरुस्त करॉन पुडॅ जादो हिकला पाय. तॅतनॅ आपल्या रॅन्याला न्याय मिळात रॅतॅ.

४. पनशळीऑ बारसॉ भाग फक्त लाकडी भूशाऑ अहलॉ तरी तिआ आतमिनसा खरा शरीर कामा ॲनाऱ्या ग्राफाइटश्या पाव्डरीआ नळी बनलॅला अहातॅ. आपुन आपल्या आतमीनॅ डॉकाऑन बगीला तॅ आपल्याला पन आपल्या आंतमिनशा बऱ्याई ओळख हवातॅ.

५. पनशळ आपल्यो खुनो मागॅ ठवॉन जातॅ. आपुन पन जगताना ताहास जगॅसा आहातॅ. आपुन जा कॅलॅ ता काम आपली ओळख आपल्या मांगॅ अहानार हाय यायी आठोन आपुन ठविली पाय.

मनुनुस तर संत मदर तेरेजा सॉताला पनशळीऑ तुकडॉ मान्याशी आन हांग्याशी , 'मॅ एक पनशळीऑ तुकडॉ हाय आन परमिसर मा दरनॅ बोठा काम करॉन हाडतॅ'

(संदर्भ: ब्राझिलियन लेखक व तत्वचिंतक पावलो कोयलो या लिखानोर आधारित)

# भय

**- क्लेमेंट डिमेलो, दोनतलाव**

धुमगाय पानी पडातॉतॉ. आब फाटलॅतॉ. जही रात जालती. दुमा आन रोजी भयशा गॉठॅत ऊबी ओथे. दुमा आथा कंदयो ऑथॉ. तॅऑ पिवळॉ परकाश गॉठॅत पडलॅतॉ. तॅआ उजेडात भय ॲंगातॅंगा करताना दिखातोती. तिला कय सईन लागात नॉता.

हांशापारा भयशा मांगॅ कसर लागले ता बगॉन दुमा बिशा दरी गॅलतॉ. बिशानॅ ॲऑन बगीला आन तॉ दुमाला बोयलॉ, “दुमा आज रातशी हॉयदॅ बवतेक, मीनॅ मीनॅ डॉकाइत रॅआ!” बिशानॅ हांगीला मीनजॅ खरास. तॉ भयमिनॅ पाहाटलॅलॉ. गावात कुना भयसा कय जाला गा जॉ तॉ पयलॉ बिशादरी धाव्यासॉ.

तारकीनुसार बगीला तॅ दुमाई भय व्यादो अजून आठ-दा दी ऑथॅ पन इ एक गोष्ट अही हाय की यात कुन कय हांगू शकॅ नाय. भगून दुमा आन रोजी दोगे जागे ओथे. गावात खुब लॉकां गॉठॅत आहा जालता. रातशी भय वेले आन वाहरू कडॅ गॅलॅ तॅऑ पत्तॉ नाय आन मंग भय रॅकॅ लागली गा लॉकांना शेत पडलॅ. तॅआ ठीक हाय जॅआ गॉठॅत शारपास भयी आथ, पन दुमाआ

ताहा नॉता. त्याई एकुस भय ओथी. ती बी घरशी पाड्डी. दुमाआ जीवाशी.! दुमा आंगळ्यात आलॉ गा तॅव आवाज आयकॉन ती रॅकॅशी.

पाहाळयात लॉकाई आवनी जाली गा, लोक त्याए ढोरे गावड्या हापाटॅशे पन दुमानॅ कतॅ आहा कॅला नॉता. लॉकाई आवनी जाली गा तॉ त्याई पाड्डी घॅऑन हॅता बांदोर साऱ्यासॉ. सारता सारता हॅता बांदोर रूजलॅला हिरवागार दॉडा आथाय काडॉन लाडालाडाय तीआ तॉंडात घालॅसॉ. बिशानॅ कॉडॅ वखत हांगीला, ‘दुमा ! आतॅ इला नाथ टोप.’ पन कादो बरा! दुमानॅ तिला कय नाथ टोपीली नाय. ती लाकडी खिट्टी जी खिळॅगथी टॉक्दार अहॅशी. भयशा नाकुटात खुपश्याशी आन मंग हुईशा नाकात्नॅ हुत खेशीतॅव त्यागथिन भयशा नाकुटाला डॉळॉ पाडॉन तॅतनॅ नाथ खॅशॅशी, मिंजॅ भयला कॉडॉ तरास. कोडयो वेदना ! भयशा पायोर डाहा बॅहलॅ हायदॅ तरी दुमा तॉ आथाय मारॅसॉ. दुमाआ आथाला रगात लागॅसा पन दुमाला तॅआ कय वाटॅसा नाय. भयला कुनाई दीठ जाली पा नाय भगून, तॅनॅ कडने तरी काहयाशी कवटी हाड्लोती ती तारीला हिरॉन तॅनॅ गॉठॅत टांगविलती.

रात खुब जालती. पानी सुरूस ऑथॉ. रोजी गॉठॅत गवानीवर बॅहलॅ बॅहलॅ जांबय द्या लागली. तहॉ दुमानॅ आथसॉ कंदयो गॉठॅत एक खांबळी ओथी तॅआ खांबळीला भरलॉ आन रोजीला बोयलॉ, ‘आज कय भय व्या नाय आपली, आंग टाकॉ सल. मॅ मिनशा राती एक फेरी मारनॅ.’ आहा बॉलॉन दुमा गवानीओर ठोयलॅलॉ ऊजवॉ पाय खाला ठॉव्या लागलॉ, तही भय दुमाऑ पाय साटॅ लागली. दुमानॅ तीआ कपाळोर आथ फिरविलॉ, ‘बॅव नाका, सुकुरमावली हाय !’ आहा बॉलॉन तॉ आन रोजी गेले नीजॅदो.

मिनशा राती वीज समकाली. गराडॉ जालॉ, तॅआ आवाजाय दुमा उठलॉ. उहॅ खालशी कांड्या पेटी काडली आन कांडा पाडॉन कुडाला भरलॅलॉ दिवॉ तॅनॅ काडलॉ आन दिवॉ घॅऑन तॉ भयवर डॉकायदो गॉठॅत गॅलॉ. गॉठॅत भय नोती. दुमाआ पॉटात फाळ पडलॉ. भय मुसक्या तॉडॉन गेलती. कंदीलाआ उजेडात तॅला रिकामॉ गॉठॉ कॉहॉ तरीस वाटलॉ.

बिदीत कुत्रे भॉकातोते. दुमानॅ गॉठॅत खांबळीला भरलॅलॉ कंदील काडॉन आथा घॅतलॉ. घरा मॅरशा हेरीतनॅ तॉ कुत्रे भॉकातोते तडे जा निंगालॉ, तव घरा मॅरसॉ पांडू तॅआ पूडॅ आलॉ. तॉ लग्विला उठलॉतॉ. “दुमाकाका, या पान्यात कडॅ साल्लॉ? आरॅ मॅनकापडा तरी घेवता ! भिजाता कादो ?” पांडू दरी हत्री ओथी. तॅनॅ दुमाला हत्रीखाला घॅटला, तिगाळा दुमाला कळला

तॉ पान्यात भिजातॅ भगून.तॅ “पॉरा माई भय हुटले !” दुमा. पांडू बोयलॉ, ’मॅ येते सल. ॲकटॉ नाका जाव. दुमातॅ पॉरपार कून नॉता भगून अडल्या-नडल्याला पांडू तॅना मदत करॅसॉ. पांडू घारा गॅलॉ आन बोठी बॅटरी घॅऑन आलॉ आन मंग ते निंगालॅ. दुमा आन पांडू बिदीतनॅ वर सडलॅ. बिदीत मांडीभर शिक्कल. तॅआ दोगाई बिद-बावखाले पायाखाला घायले पन भय कडे दिखली नाय.

दोगी सलात धुज्याआ काकड्याआ भागा मॅरॅ आले. पांडूनॅ बॅटरी घेट्लोती. तॅया बॅटरी उजेडात तॅला कयतरी दिखला. तॅनॅ दुमाकाकाला मांगॅ खेशीला. दुमाला वाटला जनवार हाय गा का? पन जनवार नॉता. पांडूनॅ दुमाला दावडला, तडॅ खांबोरशी तार तुटॉन पडलोती. ती तार सरळ काकड्यात गेलती. तारी मॅरॅस भयशॅ पाय दिखातोतॅ. तॅ पाय काकड्यातनॅस गॅलतॅ. पांडूनॅ तॉंड नाहीला. भय काकड्यात गेले हायदे तॅ तिला शॉक लागलॅ हायदॅ इ हांग्या कुना ज्योतीशाइ गरज नोती. दुमाआ आवसान गळाला. तॉ खाला बॅहॅलॉ. ‘मावले.., रमेद मावले… इ का जाला? माआ नशीब फुटला काहा ?’ तॉ बारकॅ पॉरा गथीन रडॅ लागलॉ. गॅलॅआ पाहाळयात बेजमीइ भय अहीस शॉक लागॉन मेलती. ता दुमाला आठवाला.

पांडुला कय हुमजात नॉता. का करॅसा… या आदी पन अही तार तुटॉन कोड्योतरी भइ मेलत्यो. दुमा बॉठॅ बॉठ्यान रडॅ लागलॉ. पानी थांबलॉतॉ, केळीआ आंगाठोर पान्याव एकेक थेम पडातॉतॉ. तॅऑ आवाज होडलॉ तॅ बी आख्खा भाट निज्लोता. तॅआ सामसुमित पांडुला आवाज आलॉ ‘ऑय… ऑय.. ’पांडूनॅ बॅटरी घॅऑन काकडॅआ मॅरशा भागातनॅ धाव मारली. दुमापन तॅआ मांगॅ धावलॉ. पांडूनॅ बॅटरी मारली. तॅ बॅटरीआ उजेडात तॅला आन दुमाकाकाला कयतरी दिखला. दुमा काकाई भय वेलती आन ती वाहराला साटीतोती. वाहरू ऊबी रॅआ बगीतॉता आन माकून माकून खाला पडातॉता. दुमा काकानॅ तडशा तडे मांडी घायली आन तॉ बोयलॉ, ‘मावले, सायबीने… तूअॅ आबार..!’

मंग नावळ निंगाली दुमा काकाआ वॅंग्यात वाहरू आन तॅआ मांगॅ भय. पांडू विसार कऱ्या लागलॉ, वाहरू टुक्या ओडी ताकत दुमा काकादरी आली तरी कडशी.? आन मंग पांडू पन तॅआ मांगॅ निंगालॉ.

# भिजविलॅ ताहा खड्डीला पाय

**■ हेडविजेस रुमाव, गास**

"आरे ये साबुदाण्या, तो शिंगदाणॉ कडे गठमळलॅ," तॅलानॅ भाव खादो कढईत पडाशा आदिस समशाय ठन- ठन बॉल्या लागलॉ. "ती कोथमिर ताई कत्तॅ धवॉन खुडॉन हजॉन ताटात भेहेले. ती जोडीला नारळ दादा खवॉन भॅहॉन वारता कऱ्या लागले. नाय पुरता बटाट्या काका बी भाफॉन कापॉन त्या मॅरॅ कान लावॉन हाय. मिरसी काकीला मीठा सॉळ्यासा जालॅ. ती आंगाय आग जालॅ. जिरा कत्तॅ जीव धरॉन रॅलॅ, त्याला सगळ्यात पयला तेलोर फुट्यासा हाय. कडीपत्त्याला कोथमिर ताईनॅ आयडीया दीली पैयलॉस तॅलात तडकी मार, नाय तॅ तुला कुन भाव देतूस नात. शिंगदानॉ पयलॉ घारा नॉतॉस, त्याला फिलू काकाश्या दुकानात जावॉन हाड्या लागला. मिंगॅ त्याला भुजीला, होकयला, आन आतॅ थोडा कूट्यान करॉन घ्या लाविलॅ तिगाळा त्याव सव लागॅ." बेबीनॅ खयताळॉ घायलोतॉ साबुदान्यायी खिचडी खाशी हाय तॅत्यान साबुदानॅ भिजात घायलोतॅ.

दुमी दादी हांगातॅ आमाला ताप आलॉ गा साबुदान्यायी पॅज प्याशॅ. ता बी तॉंड आवळॉन वाकडा तिकडा करीत पेतोतॅ. आमश्या भाटात हुकाळी ऊळुद वाल अह्याशॅ. हिरवॅ सनॅ कडॅ कडॅ अह्याशॅ. पन शिंगदानॉ, वटानॉ, सनॅ दारोर येतोतॅ. आतॅ ती खिचडी गा फिचडी कऱ्याशी त्यात वानॅ कॉडॅ घाल्याशॅ. बेबी हांगातॅ, दादेलो ऑड़ास नाय. पापड, वडॅ पन करात्यात. आन कय खानाऱ्यांना तॅ जाम आवडात्यात.

पयल्यान माथा धव्यादो आदी ठरवॉन ठव्या लाग्यासा. नाळ फॉडॉन त्या हिरा काड्यासा. पास-सअ जनी एकास दीहा माथा धव्याशॅ. तास भर आदी माथ्याला हिरा सॉळॉन थव्यासा. मिन्जॅ माथा नाळाआ हिरायॅ भिजव्यासा, नंतर मिंगारा सुलिओर पानी तापवॉन धव्यासा. मिन्जॅ कय रागाय खड्ड्यासा आहा बॉल्याशॅ. त्यात कून रगाजळ करतॅ हायदॅ, त्या पाठीत धपाटॅ बॅह्याशॅ. आन बॉल्याशॅ भिजविलॅ ताहा खड्डीला पाय. नाय तॅ ड़कुला करत्याव.

जानु बाय भोटी जाली ती एकटी माथा धव्यादो लागली. दादीला बरा जाला. शाळीत जाता येता घारा कामात मदत कऱ्या लागली. भाटात पन जा लागली. पन श्यार जनी जमल्यो गा त्यायो वार्तास खपात नोत्यो.. जानु देवळा जादो तॉंडाला पावडर लाव्या लागली गा बेबी विसऱ्याशी तू ओडी पाढंरी हा तरी बी पावडर कादॉ लाविता. पावलु दादा मिन्गॅ शिडव्या लागलॉ. आला तडॅ जकल्यात घनी सॉबली गा सगळे ई वर बगिद्यात, पाढंरा भूत. बेबी त्याला सपोट कऱ्या करता बी हांगातॅ, दादायो मैत्रिनी का केले मायित हाया नाताळश्या हनादो पताके रिल हाडत्याव त्या मिन्शे लाल रंगाए पताके यो निकवॉन ठवीत्यात तॉंडाला लाली लाव्यादो. तिगाळास लाल पताके कमी पडात्यात. ई आयकॉन जानु बायनॅ बेबी पाठीत धपाटॉ घायलॉ. आतॅ मा दरी माथा ऊकल्यादो ये बास गा तुला हारका करतॅ. बेबीला जानु बायश्यास दरी माथा ऊकल्यादो आवड़यासा. ती अह्यो मस्त दोन घटट्ट वेन्यो बांध्याशी की दोनदी हुटयासास नाय.

जानूला जोजप आवडयासॉ. जानूआ, दादी-बाबाला पन जोजप पसांद पडलॉ. त्यांना वाट्ला पॉर संसारी हाय, बय-बापाय, भाआ-बेनीआतान आयकातॅ. काळजी घॅतॅ. बरी नोकरी हाय. जोजपला बी जानू आवाडली. दोगा घरनॅ रीतीरिवाजानॅ गाजावाजात लगीन लावॉन जाला. लगीन जाल्योर दोन-शार वहरे भरले. त्यात दोन पोरे जाले. दोनी पोरे कुटुंबात भोटे हवात सललोते. जानु कामोर जावॉन यॅवॉन घरात कामकाज करतोती. पन हळूहळू ती पोराआ आन तीआ पन लक्षात यादो लागला. आपल्याला कय कऱ्यासा हायदॅ तर परत्येक गोस्ट भोट्या बयला हांग्या लागातॅ. आन त्यात बी कुनतरी नाक घुसविता अहातॅ. कय मोकळापना नायीस. त्याआ जानूला खुप वाईट वाट्यासा. मग त्यामुळॅ तीआ आन नवऱ्यामिनॅ काटा-किटी हव्या लागली. ई गोस्ट लक्षात आली पन कुनॅ ऑड़ा कानोर घॅतला नाय.

जानूनॅ शार गोष्टी पोराना हिकवॉन ठवीलॉत्यो. दॅवानॅ दोन कान दिल्यात, त्यात एका कानायॅ आयक्यासा दुहऱ्या कानायॅ हॉड्यासा. कून कामा-काजोर गाडी घॉड्यातनॅ जात्यात त्या मांगी वाईट कय बोल्यासा नाय. नवऱ्याय शानी ती आख्या जगायी शानी. जानूला माईत हॉता आपल्या घरात ऑड़ा- ऑडा कय हवॅ गा नाय लोक वाटूस बगित्यात. आपल्या माहनाना आपून हांबळॉन घ्यासा गा कय वाईट हवॅ नाय. आपलॉ संसार आपल्यालास कऱ्यादो लागॅ गा.... भगुन तीनॅ मनात ठरविला, "भिजविलॅ ताहा खड्डीला पाय".

# आठोन

-- विजू वाझ, दारशेंग

१. एक आठोन

तीस पस्तीस वहरा आदी आपल्या अडश्यो बायो अरनाळा,वसय किल्लाबंदर आनू पासूबंदरशा बंदरा जातोत्यो . बाफलॅल्यो वालायो हिंगो, बाफलॅलॅ सनॅ, वटानॅ , भाटशे कॉनफाळ , हॅन इ घॅऑन पातेरातशा बसमिनॅ बॅहॉन हाकोटशे पॉसातोते.

जहयो गावडयाश्यो बायो करंदे (करवंदं) ,बोरे आनू काजु घॅऑन आपल्या अडे याश्यो, आपून तिगाळा (लाने पोरे ) घरशी शिस नायतॅ तुटलॅलॅ पांडॅ कांदॅ दॅऑन तॅंआ दरनॅ घ्याशे.

बंदरा कोळ्याए पोरॅ हुक्कॅ मांदेळे, बुंबुल, हुकट, हुत्योऱ्यो, करंदी, जवळॉ घॅऑन आपल्या दरनॅ तॅआ बदलॅत आपल्यो वस्तु घेतोत्यो. मिनॅस ते पोरे बॉल्याशे अवरं मावरं दिलं कवरं देतेस तू ? देस ना, बेनाचं हानलंय, जापतेस काय तू ? वार ना ? मंगाचं हाय ते.

कहांबाहा ता जक्ला दॅऑन हुक्का हरी निलॅल्या गुनीत आनू टोपलॅत आखिरी करता मावरा घॅऑन आपल्यो तिगाळश्यो बायो याश्यो.

ती मजा पन अलग ओथी.

आतॅ काळवेळ बदालॅलॅ. जक्ला पालटाला . बंदर गॅला ता बाफलॅला गॅला त्यो बोरेवाल्यो आनू बंदरावाल्यो पडद्याआड गेल्यो.

रेल्यो फक्त आठोनी.

*****

२. एक मयनॉ आदीस

एकदा देवळा शिठी वासली गा सुरूवात. हाकोटसॉ आंबॉ पाडयासा वारना , एक भोठॉ फाटॉ (आतॅ एक डांगळी/डाहाळी. वर हांगातॅत कॉडॉ. ) पाडयादो आख्या गावशे जमा. मंग गानॅ बॉलात फाटॉ कापॉन बारक्यो पासरी करॉन ठविल्यो गा मंडळी बेहली घर धन्यानॅ कुपॉ ठविलॉ गा बाफलॅल्या सनॅय ताट आलॅ.  मॅलॅल्या पासून जेत्तॉ हाय तॅआ परयंत जकल्या सुखाला आनू दुःखाला... आख्खे फुल टाईट.

मंग तॅआ दिहापासून रॉज रातश्यो मॅरदॅरश्यो बायको हिंदळ्योर बॅहॉन गानॅ सालू. अॅखाद दोगी रंगीलॅ लागातोतॅ घुमट वाजव्यादो.

लगनाऑ आठवडॉ नजीक आलॉ गा धामधुम जॉरात. हुकुरवारॅ मांडव घाल्यादो परत गाव तयार. आपल्या घरसास लगीन, कुन थादॅ घॅऑन, कुन पारयनॅ दर (खडडॉ) खोदीतॅ तॅ कुन आंब्याआ पानाआ तॉरान तयार करतॅ. हांज्यादो मांडव कापडॉन हजवॉन तयार.

अॅक मॅरनॅ सुली मांडॉन तळनाऑ  पिठ आलॅ, धावपळ सालू. गावश्यो बायको आल्योगा तळान काड्या सुरवात... हक्कुरवार, हिनवार आनू आयतवार आख्ख्या गावात सुली पॅटात नोत्यो. जक्ले खादो, प्यादो लगीन घारा. मंग हंवारै सौदिऑ ती मजा तर लगनापॅक्षा भारीस.

बरा या पुऱ्या आठ दिहात कुनॅत कंपनी शॉद्या लागातोती. कारन तीन शार कुनॅत. कुन कुनाआ पॅंढ्याआ ऊडव्यात तॅ कुन झाडाखाला तॅ कुन मिंगरशा केळीत मिळातॉतॅ...

मंडळी लिव्यादो खुब हाय, पानू ती मजा कतॅस याशी नाय.

*****

३. बाए मिस्सा सालू झाला.

बाए मिस्सा सालू झाला. आपलॅला का लाभ?

आला आपून आतॅ खाशा कडेवर जाश्यो, आपलॅला दॅवळात जागा नाय.

कतू भडकालॉ कुना पुतानॅ नाय हांगीलॅ ? पातेरातसा पयला मिस आपला. तुला हांगॉगा एक मन हाय देऊळ भरला आटोकाठी लुदरीक शेठ करता फादर खोटी.

कुन्या आयकाना इ करोना आलॅ मनून बिसायबानॅ नियम कॅल्यात माई ओबाय बोयली.

दादय पिलाख आलतॉ कालेरॉ आलतॉ कय बन ऑथा गा ? इ करुना आनू अरुना कुन ? यां मायला देवळात हाकोटे आपूनूस आथ बिए इ तरुन कंपनी कडीओर उजेड पडॅ परयंत ऊठात नात. आंगाऑ पंगारॉ कॅलॅ.

सांतू ! आपल्या तरुन पनात आपून का का कॅलॅ. हॅन हाडॉन आपले कारवॅय कुड हारविलॅ, ओहरी ऑटॉ,दापूड मिंगारा हारविला. आत्यायो ऑबायला हॅन का तास गाइ नाय.

ऑडयात शिमु आलॉ कावड डेवरली. तावात बोयलॉ ‘हेनी बुडल्यो आन दगड तरांगलॅ’ आयकाताआ बना लॉंगरॅय शंभर आनू हजारीआ लॉंगरॅय दिडशे. आळुला पंधरा आनू तेरीला पंचवीस. का विकॉ? माआ आयसॉ नवरॉ ?

शिजु लाडात बोयली तॉ कत्तॅस दॅवाला विकीलॅ.

---

# जिगाळा माला देव भॅटातॅ...

**- बॅप्टिस्ट एम वाझ, दारसेंग.**

थंडीअॅ दि ऑथॅ. तॅत आयत्वारसॉ दी! बायकू बरबर हाकोटे मिस्साला जावॉन आलॉ. सुलीपुडशा खुरशीओर बॅहॉन गराम गराम शा सॉ एकेक घोट घॅतोतॉ. तॉ घॅताना जाम बरा वाटातोता. ऑडॅत दापुडशा दराई बेल वाजली. आतॅ या टायमात कुन आलॅ हायदे अहॉ विसार करॉन भॉट्या नाराजीनॅ खुरशीओरनॅ ऊठलॉ. दापुडसॉ दरवाजॉ उगडलॉ.

समोरशा माहनाला(?) बगीला आन माई दात खिळी बेहली. मॅ जाम घाबरलॉ. घाबरॅए माला घाम हुटलॉ. बायकूला हाक मार्‍यादो वाटला पन तॉंडातनॅ शब्द फुटात नॉतॉ. मॅ तॉंडा आऽऽ

करॉन समोरशा माहनाला बगीतूस रॅलॉ. ऑडॅत तॉ माहणू बोयलॉ, “ आरॅ माला आतमीनॅ तरी घॅंदा गा नाय”

मॅ तॅला आतमीनॅ यादो हांगिला. तॉ सोफ्योर बेहल्योर बायकूला हाक मारली. ती सुलीपूडॅ पुऱ्यो बनव्या लागलोती. भगून ती नळी आथात घॅऑनूस हॉलमिनॅ आली. तिनॅ सोफ्योर बॅहलॅल्या माहनाला बगीला आन तीआ आथाशी  नळी खाला पडली. ती कय घाबरली नोती, पन तीआ तॉंडोर आश्चर्याए भाव दिखलॅ. कारन समोरसॉ माहनू दुहरॉ तिहरॉ कून नॉतॉ, तॅ सॉता प्रभू येशू ख्रिस्त ऑथॉ.

फिक्कट आकाशी निळ्या रंगाई पॅंट आन वरती राखाडी रंगाआ टीशर्ट, पायात सकसकीत बूट, बारीक   केलेली जुरूक्षी दाडी आन  थॉडॅ अस्ताव्यस्त केस, 30-32 वहरा तरुनाआ रुपात तॉ आमशा घारा आलतॉ. तॅआ तोंडोर बेफिकीर भाव पन डॉळ्यात दयाळू भाव बगॉन माला खूब धीर आलॉ आन वाटला मॅ उगास घाबरलॉ.  खरामंजे माला आनंद हॉव्या पावतॉ. पन कतॅ कतॅ जास्ती आनंद जाल्योरपन माहनू घाबरातॅ  ई मा धॅनात आला.

आमॅ गप बेहलेले बगॉन तॉस मरशानला बोयलॉ, “ मरशान मॅ पन तुमशा बरबर नाश्तॉ करनार हाय. तॅ पुरी भाजी जरा वाडी बनव” मा बायकूआ नाव आन पुरी भाजी बनव्या लाईले ई तॅला न हांगता कळला ई बगॉन तॉ खरोखर येशू ख्रिस्तस हाय ई आमशी खात्री पटली.

आमॅ तिगे सुलीपुडॅ आले. आमी दोगी खुरशीत बॅहलॅ आन मरशान नाश्तॉ बनव्या लागली. खुरशीत बॅहता बॅहता तॉ बोयलॉ,  “ स्विडल अजून निजले वाटातॅ”  स्विडल आमशी एकुलती एक पोरी. लाडात वाडलेली. रातशी लेट निजातॅ आन हाकोटे लेट उठातॅ. मॅ कय बॉलॅ तव तॉस बोयलॉ,  “आज मिस्साला गेल नाय वाटातॅ” मा तॉंडोरशॅ  नाराजीअॅ भाव बगॉन तॉ बोयलॉ “नाय गेली तास बरा हाय, नाय तॅ तुमी रॉज देवळा जाऑन तुमशात कय सुदारना जालेली वाटॅ नाय. मंग का फायदॉ?”

ता आयकॉन मॅ बॅताम घाबारलॉ. कारन  माय जक्ले  बरे वाईट गुपीते अॅला अंतरज्ञानानॅ माइत अहनार. मॅ या विसारात असताना बायकूनॅ  टेबलोर पुरी भाजी ठोईली. दॅवानॅ  स्विडलला उठव्या हांगीला. ती उठल्योर आमी सोगी बॅहॉन नाश्तॉ कॅलॉ.

बॉलता बॉलता तॉ स्विडला बोयलॉ, “ रोहितशी आन तुई भॅट कडे जाली? तॉ पॉर बरॉ हाय. हिंदू अहलॉ तरी त्याहरी तू बॅलाशक लगीन कर. तू सुखी हॉयदा” आमॅ ई आयकॉन विसारात पडले. आमाला ई कय माईत नॉता. मॅ मरशानशा तोंडोर आन मरशान मा तोंडोर बग्या लागली.

स्विडल पन विसारात पडली. माइ आतॅ खात्री जाली की ऑ देव हाय, ॲला जक्ला माइती हाय. पन ऑ किरिस्ताव अहॉन ॲका हिंदू पॉराबरबर लगीन कऱ्यादो को हांगातॅ. देव वॅडॉ तॅ नायदे ना? मा मनासा जानॉन तॉ बोयलॉ, “फरशा तूमी जक्ले ॲकास दॅवाए पोरे हा. वायलॅवायलॅ धर्म तुमी माहनानॅ निरमान कॅल्यात. रोहीत स्वीडलशी काळजी घॅदॅ. पन तुमी लगना आड यॅऑ नाका”

“पन तॉ हिंदू हाय आपून ख्रिश्चन ई कहा हॉयदे?” मरशानला रॅवाला नाय मनून ती बोयली. “हिंदू- ख्रिश्चन अहा कय नहातॅ. माणूसकी ऑस खरॉ धर्म. बरा बॉलना, बरा वागना, बायकुनॅ नवरॅई आन नवरॅनॅ बायकुई काळजी घॅना, गोर गरीबाला मदत करना ऑस एक धर्म हाय. तुमी फुकटशॅ वायलॅ नावानॅ धर्म बनवॉन लॉकाना फशवित्या.”

काल तुमशा वडाखालसा हॅत निंद्यादो मजूर आलतॅ, तॅन्ना २५० रुपये मजूरी द्यादो तुमश्या कॉडा जीवोर आला. तॅइ आख्खॉ दि निंबरात काम कॅला. तॅला एक वडापाव द्यादो मरशानॅ कोडी बडबाड केली. मरशान सरकारी नोकरी करतॅ. तिला हिनवार आन आयत्वार हुट्टी आहातॅ. वहराला एक मयनॉ भर पगारी रजा मिळातॅ. मंजॅ रजा पकडॉन दिहाला दोन हजार रुपय आन एसीमिनॅ हाईलात भॅहॉन तासाला तीनशे रुपय कमायतॅ आन मजूर लोक निंबरात ८तॅ९ तास काम करत्यात तेंल्ला अडिश्शे रुपय द्यादो तुमशा जिवॉर आला. ई एक परकारसा पाप हाय. तुमी देवळा जाऑन प्रार्थना कऱ्यापेक्षा तॅआ मजूराबरबर दयेनॅ आन मायेनॅ वागलोशॅ तॅ तुमाला जास्ती पुण्य मिळालॉसा.

मॅ आन मरशान ई जक्ला शांतपनॅ आयकातोते. आन आमाला आतॅ तॅऑ शब्द न शब्द पट्या लागलॉ. धरमाऑ खरॉ अर्थ कळॅ लागलॉ. आमे विसार करित अहतांना तॉ बोयलॉ, “ फरशा आपुन मावरा हाड्यादो बाजारात जाव सल” मॅ दॉपारसा तुमशाबरबर जीव्यादो थांबनार हाय” ई आयकॉन मॅ अजून घाबारलॉ. मॅ बोयलॉ “दॅवा तुमी मा बरबर बाजारात आलॅ तॅ जक्ले लोक तुला ऑळखॅद्यात. आन तुआ मॅरॅदॅरॅ जाम गर्दी हॉयदॅ आन आपल्याला मावरा घ्यादो मिळॅसा नाय” देव बोयलॉ, “तॅई तू कय काळजी करॉ नाका. कारन मॅ फक्त तुलास दिखॅनॅ. मॅ बोयलॅला फक्त तुलास आयकॉ येदॅ”

मग आमी मावरा हाडॅदो ईबंळोरश्या नाक्योर निगाले. देव मा मांगॅ गाडीओर बॅहलॉ. मॅ ॲका ओळखिशा कोळनीदरी गॅलॉ. तडे ओळखीए लोक माला बगॉन आथ करतोते. दॅवाला कून आथ करीत नोते, योरनॅ माला हुमजाला गा देव कुनाला दिखॅ नाय. कोळणीदरी भोठे पापलेट ओथे. मॅ तिला शार पापलेटशी किंमत विसारली. तीनॅ तीन हजार हांगीलॅ. मॅ तिला दीड हजार कॅलॅ. ती बोयली,” दोन हजारपन करॉ नाका” देव मा कानात बोयलॉ २२०० रुपय दॅऑन टाक.

मला माग वाटले. पन दॅवापुडॅ मा कय सलला नाय. मॅ कय न बॉलता कोळणीला २२०० रुपय दिलॅ आन पापलेट घॅटले. थॉडॉ भाजीपालॉ पावतॉ. देव मॅरॅ अहल्यामुळॅ तडेपन कय घासीघीस न करता भाजीपालॉ विकत घॅटलॉ.

आमी घारा आले. बायकुनॅ पिशवीसा मावरा आन भाजीपालॉ बार काडलॉ. भोठे पापलेट बगॉन तीनॅ डॉळॅ वटारीत किंमत विसारली. देव बाजूला अहल्यामुळॅ मॅ नेहमी परमानॅ खॉटा न बॉलता खरी किंमत हांगीली. त्योरती ती बोयली, “तुमाला जक्ले लोक फसवित्यात” त्योर देव बोयलॉ, “कय फसविला नाय. ते पापलेट तीनॅ २००० रुपयला विकते घेट्लोते. त्यामिनॅ तिला फक्त २०० रुपय मिळालॅ. ती हाकोटे 5 वासता उठॉन पासूबंदरशा बजारा गेली. ऑडा भॉठा ऑजा घॅऑन ईबळोरशा बजारा आली. जक्ला मावरा विकॉन तीला दिहाला फक्त पाश्शे तॅ सशे रुपय मिळात्यात. आपून तीनॅ घेटलेली मेहनत, तिला लागलॅलॉ वेळ इ जक्ला बगॉन कोळणी हरोर जास्ती घासाघीस न करता मावरा घ्या पाय. आंग मेहनत करनाऱ्यांई पिळवणूक न करता कमीत कमी तेंन्ना जग्यापुरता तरी पैशॅ मिळद्यात ई पैशानॅ सदन अहलॅल्या माहनानॅ तरी बग्या पाय. ऑस खरॉ धर्म हाय.

देव बॉलातॉतॉ आन आमी आयकातोते. “पन रॉजसा जीवन जगतांना कहा वाग्या पाय इ आमाला फादरनॅ कतॅ हांगिलास नाय.” मॅ आन मरशान आमी एकदम बोयले. देव बोयलॉ,”मॅ तास हांग्यादो आलॅ. तुमी वाडदी साजरॉ करॅदो हॉठेलमीनॅ जात्या. दारु पेत्या. सूप पेत्या, आईस्क्रीम खात्या. टेबलोर बिल आला ता कय न बॉलता जक्ला देत्या, वरती जाताना शंभर-दीडशे रुपय टीप देत्या तिगाला तुमाला कय वाटॅ नाय. पन कोळणिला, मजुरांना, फेरीवाल्यांना १०-२० रुपय वाडी दॅआकरता तॅआ हरी घासाघीस करॉन तॅआ मजबूरीऑ फायदॉ घॅऑन आर्थीक पिळवणूक करत्या. ई पाप हाय.” दॅवाआ ई जक्ला बॉलना आयकॉन आमाला पाप-पुण्याई वाख्या नव्यानॅ कळली.

दॉपारसा जिवताना देव बोयलॉ, ”मरशान तुआ आथाला सव हाय पन तहीस तू शेजाऱ्याबरबर वागतांना, ऑफिसमिनॅ काम करतांना, गाडीत सहप्रवाशा बरबर वागतांना सुदा दिखली पा. तरुस तुला खरॉ धर्म कळलॉ अहा मॅ समजॅनॅ. हांसॉ शा पेताना दॅवानॅ आमाला निसर्गाइ जपनूक कादो केली पाय, घरशा कसरॅई वाट कही लाविली पाय, बावखाले साफ कादो ठोविले पात, सार्वजनिक स्वच्छता कही ठोविली पाय, दुहऱ्या हॅताॲ कांडॅ न फोडता देखील आपली बरकत ऑथॅ ई आमाला हांगिला आन शेवटी “मॅ तुमाला हांगिलॅ तह्यापरमानॅ तुमी वागले तॅ तुमाला कय कमी पडॅसा नाय. तुमी सुखी हॉयद्या, ऑहॉ आशिरवाद दॅऑन तॉ दिखॅसॉ पावलॉ.

तॉ गेल्योर मरशान बोयली, ”देव आपल्याआ घारा आलॉ, आपल्याला बरी हिकवन दिली, आतॅ आपून दॅवानॅ हांगिल्यापरमानॅ वागॉ”  मॅ पन बोयलॉ, “हां, आपून प्रयत्न करॉ या!”

“हाकोटशॅ नव वाजलॅ अजून ऑ आथूनात डुकराघती लॉळातॅ. कय लाज शरम वाटातॅ गा नाय?” मा बायकुआ गॉड बॉलना  मा कानोर पडला आन माला शेत पडलॉ. मंजॅ ई सपना ऑथा तर.. मंजॅ मॅ हापायलॉ.. पन कॉडा मस्त हापायलॉ.. आमाला बरी हिकवन  मिळाली...!

---

# गावठी वालाआ हिंगाई खासियत

**- पायस तुस्कानो (घोहाळी)**

आपल्या निसर्ग सृष्टीइ ई भोठी कमालूस हाय. बगा गनी जकल्या सीजन मीनॅ आपल्याला वॅगवॅगळ्या परकारशे फळे आन भाज्यो बजारामीनॅ खा करता कायीमश्यो मिळात्यात. पन कय भाज्यो नाते फळे अहे आहात्यात गा आपल्याला त्याकरता वाट्यात डॉळॅ घाल्या लागात्यात आन बेताम वाट बग्या लागातॅ. त्यामिनशी एक भाजी मिंजॅ  आपल्या वसयश्यो गावठी वालायो हिंगो.

पाहाळॉ गॅलॉ गा सादारन ऑक्टोबर-नोवेंबर मयन्यामीनॅ भाताई कापनी आटपाली गा हॅता ओलोरती कांड्या मॅरॅदॅरॅ वालाव खॉसरॉ मारत्यात. अही वालाई लागवड वसयमीनॅ बवतेक लोक आवडीनॅ करत्यात.  कय लोक कारवीऑ मांडव करॉन वेली वाल पन लावित्यात, त्या उत्पन्न शार मयने पुराते. ऑ एकपरकारसॉ जोडधंदॉ हाय.

वालाई लागवड ऑ जुन्या लॉकांव वहरोंवहरे सलात आलेलॉ धंदॉ. वाल मारॉन मयनॉ जालॉ गा वालाला फूल या लागातॅ. कांडयोरशा वाला हिंगाला सव एकदम भारीस, भाजी खायदा का? पयल्या हिंगा बाजाला जाम तेजी आन “जॅआ माहना हिंगाला भाटामीनॅ जास्ती बाज तॅआ शार मयने सलातॅ राज”.

पयल्यो हिंगो सालू जाल्यो गा त्याव किलोआ मांगे का भाव घ्यासॉ ती किंमत बवतेक दलाल स्ट्रीट वरनॅ शेयर मार्केटशा ऑफिसला येते. जहनी वाला हिंगा ट्रेडिंग सलातॅ. जॅला तॉ भाव

परवडातॅ तॉस वालाई भाजी खाऊ शकातॅ. सब्बान लॉकांना सुरवातीला इ परवडॅ पन नाय. कय वॅळा हिंगा करता ओळखपाळख काडॉन वशिलॉ लाव्या लागातॅ.

पयल्या हिंगाई भाजी केल्योर आन खावॉन जाल्योर सोशल मीडियावर त्याय फुटू डकविले गा येनारे "लाईक्स" इ त्या माहनाला मीळालॅला सर्पतिकीट. आन मंग तॉ आख्ख्या जगाला हांगात हुटातॅ, 'गावठी हिंगा विशयी बॉलदा तॉडा कमीस' अही या वाला भाजीइ खासियत. नंतर एकदा का हिंगो सस्त्यो जाल्यो गा पोरे पिडी-बांडी भुज्या तयारीला लागातॅ. या शार मयन्यामीनॅ बायकू पन खुश नवऱ्याला विसरी पन नाय गा आज जिव्या आन हाकोटे डब्याला का करेसा? ऑ प्रश्न वालाआ हिंगाई सुरवात जाली गा नीगॉन जातॅ.

जुने माहने हांग्याशे, 'पॉरा वालाय गॉळॅ वातूळ पन भाजी खादोस वाटातॅ मन नाय मॉडॅ जिव्या.' "वाला गॉळॅइ भाजी, त्यामीनॅ घालॅ वांगा आन जीवल्योर दॉपारसा हळुसकन करॅ आंगा". थॉडा टाकीला गोडेतेल वाडी त्यामीनॅ काळा रवयसा वांगा, भुजलेली बुम्ब्लाई काडी आन शिश्या आंबाट कालवान, मंग वाला गॉळॅइ भाजी खायदा का? या सीजन मीनॅ बी कय नाका पन तॉडाला पानी हुटलॉ तॅ कय नवाल गा..?

---

# डुकरा मटन आन राजकारनी

**– फ्रँक मिरांडा, उमराळा**

वसयमिनॅ डुकराआ मटन विक्या बंदी घायली गेली. डुकरा मटन विकॅसॉ धंदॉ बन जाल्यानॅ बरॅस लॉकां कमायसा सादन गॅला. पन मांगॅ हठॅद्यात तॅ वसयकर कहॅ? डुकरा मटन खाशी आग अहलॅलॅ आमी वसयकर जमलॅ आन आंदोलनाला सुरुवात केली. पयला योर कुनॅ लक्ष दिला नाय, पन जिगाळा आंदोलन राज्यव्यापी जाला तिगाळा मंग मीडियानॅ योर विशेष धॅन दिला. दारामिंगारा पक्षाय झॅन्डॅ घॅऑन फिरनारॅ राजकारन्याई ई मॅटर तॅंआ सायबांपोत पोशविला आन मग देशपातळीओर लोक वसयला ऑळख्या लागले. रॉज कुहनॉतरी नेतॉ वसयमिनॅ यासॉ आन भाशन दॅऑन जासॉ:

==> सुरेंद्र गोदी:

जमलेले वसयकर, उपस्थित डुकराआ मटनाई आग अहलेले जकले आंदोलक आन गावठी कॉबड्याव चाहतॉ वर्ग यांना मा चौकीदार स्टाईलनॅ प्रनाम! मित्रांनो, मागशा ७० वहरात आपल्या देशाई का हालत जाले ई आपून बगितॅव. पंडित नेहरू आन काँग्रेस सरकारमुळॅ आज तुमशोर ई संकट आलॅ. नेहरू आन गांधी कुटुम याला जबाबदार आथ. पन तुमी घाबरॉ नाका, ई परदेशात एक्सपोर्ट कॅला जानाऱ्या काळा मटनाऑ (ब्लॅक मीट) खडॉन-खडॉ आमी स्पेशल टीम तयार करॉन शॉदॉन काडनार आन १५-१५ किलो गुनी भरॉन काळया बाजारासा ई जकला मटन तुमशा परतेका दापुडॅ पॉस्ता करनार ई मॅ तुमाला वचन देतॅ.

अबकी बार - डुकरा मटन आरपार!

हर-हर डुकरा मटन, घर-घर डुकरा मटन!

==>भोगीनाथ:

काँग्रेस सरकारशा बेजबाबदार आन अनियंत्रित कारभारामुळॅ आपलॉ दंदॉ आन धर्म जाम धॉक्त हाय. आपल्याला एक हॉया लागॅदॅ आन या वाकडॅ गॅंगला धडॉ हिकव्या लागॅदॅ. तॅई तलवारी काडल्यो तॅ तुमी कोयतॅ काडा आन या देशातनॅ तॅना मिटवॉन टाका. याकरता तुमी राष्ट्रीय डुक्कुर मटन संघाई मदत घेवू शकातॅआ. इ एक ** राष्ट्र हाय आन अडॅ गाय आन डुक्कुर खासॉ मंजॅ महापाप हाय, तरीपन तुमशो भावना दुखावल्यो गेल्यो पा नात भुगून आजपासून पिग सा नाव "बिग" आन गायसा नाव "बाय"

"पानी मांगा तो बिअर देंगे

खाना मांगा तो चिकन देंगे

उंगली मांगा तो हाथ देंगे

लेकीन डुकरा मटन मांगा, तो चीर देंगे"

मटन यही बनेगा!

==>बाऊल चांधी:

तॅआ दिहा फेक्या गोदी बोयलॉ गा आमी परदेशासा ब्लॅक मीट परत हाडनार. माला तॅला हांग्यासा हाय, आमाला ब्लॅक मीट नाका, आमाला पांडा नातॅ तांबडा मीट पाय. दुहरी गोष्ट - डुक्कुर विमानात हाडलॅ तॅ तॅना सीट बेल्ट बांदिता यासॉ नाय, त्यामुळॅ घात होवू शकातॅ. तिहरी गोष्ट - जर परतेका दापुडॅ १५-१५ किलो मटन धाडनार हायदॅ तॅ तॅआ हरी फ्रिज पन धाड, नायतॅ ता ऑडा मटन ठॉयसा कडॅ?

==> ताज झाकरे:

अडॅ जमलॅल्या मा जकल्या कुपार्यानो, कुमाऱ्यांनो आन डुकरा मटन खाणाऱ्यानो, काल आंदोलनाव एक व्हिडीओ बगीलॉ आन माला सैन पडॅसा रॅला. आपल्या गावात ॲवॉन जॅआ बारगावशाना आपुन जागा दिले तेस आज आपल्या डोख्योर सड्या लागलॅत, अतॅ शांत रॅऑन सलेसा नाय, ऑ आपल्या अस्तित्वाऑ आन अस्मितेऑ प्रश्न हाय. या पुडॅ आपऑ माहणू डुकरा मटन विकितॅ हायदॅ आन या भडव्यांई जॅ तुमाला दादागिरी दावडली तॅ तॅना तडॅस नांगुटा करॉन जनसे स्टाईलनॅ धुलाई करा. जय हिंद, जय महाराष्ट्र!

==>नितीन आठगावकर:

नमस्कार कुपारी सैनिकांनो! आज तुमझ्यापुडॅ गंभीर विषय घॅऑन आलॅ. नीट लक्ष दॅऑन विषय कॉडॉ गंबीर हाय ता समजॉन घ्या. काल मॅ वसयला गॅल्तॉ आन बगितॅ तॅ डुकरा मटन बन, स्थानिक लोकोर अत्याचार सल्लॅ.  आहा काम करन्यामागॅ कुनाव आथ हायदॅ? कायदॉ, सुव्यवस्था, प्रशासन या सगळ्यांना फाट्योर मारॉन अडॅ जॉ मनमानी करतॅ तॅआ जकल्यांना मॅ ठॉकनार ई नक्की. मुंबईमिनॅ तुमी कडॅपन लपा, तुमाला मॅ शॉदॉन काडनार आन हारकॉ मार दॅनार. मुंबयमीनॅ कुनाईस दादागिरी सल्याशी नाय. जर सामान्य जनतेई कून फसवनूक करतॅ हायदॅ तॅ तॅना न्याय मॅ मिळवॉन दॅनार.

==> कृती गिराणी:

काँग्रेस सरकारनॅ सत्तेत अहताना वाग प्रकल्पात घॉटाळॉ कॅलॉ आन त्या प्रकल्पाशॅ बरॅस वाग पक्षामिंनशा जुन्या नेत्यांना दिलॅ भगून भारतात वागाई संख्या घटली. या भ्रष्टाचाराई आमी लवकरूस कसॉन तपासनी करनार हाव. अतॅ जरी ते सत्तेत नहले तरी आमाला माईत हाय या डुकरा मटन बन करन्यामागॅ काँग्रेस पक्षाव कयतरी हेतू हाय भगुन ई जक्ला जालॅ. मॅ या परकरनाव तीव्र विरोध करतॅ आन तूमाला वचन देतॅ गा उद्यापासून मॅ संसदेमिनॅ आमरण उपोषनाला बॅहनार.

==> कामदास पाठवले:

मटन खपला, काळजी खपली, रेली फक्त वदडी
मटन खपला, काळजी खपली, रेली फक्त वदडी
रात जाली, निज आली, आथर अतॅ गोडदी.

मटन खाला, आन्दाळ खाला, रॅलॅ फक्त पाय
मटन खाला, आन्दाळ खाला, रॅलॅ फक्त पाय
बोटे खूप सुंबीले, अतॅ प्लेट धो जाय.

---

# पेटुल्यासा तांबडा लुगडा

**– सॅबी परेरा, भाटी**

ओहरित एक पेटुला हाय
पेटुल्यात हाय एक बॉसका
बॉसक्यात हात जुने कपडे
वाकळ, सादर, मांडुला, खॉयारा
त्यातूस हाय घडी कॅलॅला
तांबडा हायतनी लुगडा
लाल-पिवळी कानी, तॅरा आथ लांब
लांब हाताई सोळी, त्योर कशिद्याआ काम

आमशी बय तीआ लग्नात
इस लुगडा नेहलती
मायार हॉडॉन हाऱ्या येताना
यास लुगड्याय टांग्यात बेहॅलती

गय, गॉठॉ आन भाटात खपता
कॉडॅ हरान-भादवॅ गॅलॅ

हनाॲ मिशे आन मावलीॲ नॉयानॅ
यास लुगड्यानॅ आयकिले

डॉळॅत आलॅला आंहू कतॅ
यास लुगड्याला पुहीला
मनासा दुख लुगड्यात गुंडाळॉन
लुगडा पेटुल्यात ठविला

मयनॅ गॅलॅ, वहरे गेले
संसाराइ पन हुरूम जाली
कोडीही कांजी केली तरी
लुगड्याइ घडी जुरुक नराम जाली

आदी आमसॉ बाबा दॅवा घारा गॅलॉ
तॅआ मांगोमांग बय पन गेली
जाताना माला मॅरॅ बॉलवॉन

पेटुल्याइ सावी माआ आथा दिली

कतॅतरी पेटुल्यासा तांबडा लुगडा
मॅ आंगोर टाकॉन बगीतॅ
लुगडयाआ एकेक धाग्यातनॅ
जनू बय माला वॅन्गॅत घॅतॅ

तॅआ लुगड्या विरलॅल्या हुतातनॅ
अजून बयशॅ गानॅ आयकॉ येत्यात
तॅआ लुगड्या उतारलॅल्या कानीतनॅ
अजून बयश्यो कान्यॉ आयकॉ येत्यात

अजून दिखातॅ आंबोल्याई माळ भरलेली
तांबडा लुगडा नेहलेली बय
अन लांबलांब जानारा टांगा
तुई जाम जाम खीत येतॅ
ऑडा कुनॅ मा बयला हांगा

# एक ऑथॉ बाबा.....!!

– संगीता वाझ

भाटामिनॅ फेरी मारदा
हुकलेले झाडे बगीदा
बावीतशा राटाआ मोडलेल्या खुटोर
नंदार टाकिदा तिगाळा.....
बग बाबाई आठोन येते गा ?

हेजे खासरे ऊगाळले
तडे नवे घरे जाले

दांड पोंदळ गॅलॅ
पाईपाआ राज्य आलॅ
भाटे बेऑन डॉकायतॅत
आतॅ ॲ भैय्या कडशॅ आलॅ ?

दवनॉ मॉगरॉ जकलॉ निकलॉ
कोथमिरीऑ वास खपलॉ

दा रूपाला शार काडयो
बजारातनॅ हाडता तिगाळा.....
बग बाबाई आठोन येते गा ?

आथा कुदळ अन् पाठीओर निंबार
घामाय निथळातॅ पान पान्याकरता रजार
तू हाडलॅ दलाल आन विकीली खार
हिरव्यो तांबड्यो नोटी
शारू वाट्याय पळाल्यो आतेतरी......
बग बाबाई आठोन येते गा ?

तांबड्या टोपीत बाबा
जहनी पॉपसायेब दिख्यासॉ
वसयकराऑ माल नुसतॉ
नावोरनॅ विक्यासॉ
खांद्योरशा कावडीला
खुरसाऑ ऑथॉ मान
वसयवाळॉ आलॉ नाय गा
मंबयकर हैरान
केळीये जोड जॉडॉन माहने जॉडनाऱ्या
बाबाई बग तुला आठोन येते गा ?

हान्सॉ थकॉन भागॉन पॉरापारात यासॉ
दिहाभराऑ विहांबॉ भगून
नवटाक पावशेर घ्यासॉ
बाबानॅ फाटका सदरा घायला
तुला सुटाबुटात हाडला
आतॅ मित्राहरी चिअर्स करता तिगाळा....
बग बाबाई आठोन येते गा ?

दि-रात करॉन वाडविला
रगात आटवॉन हिकविला
शेठशा घारा गाआन रॅवॉन
तुला त्यानॅ बार धाडला
देवळात जाता तिगाळा
खाशीओर लांबनॅस डॉकायता
आल्मा दिहा निमताला
शार मेनवात लाविता
बाबाई जिंदगी अहीस जळली
तू बाबा जाल्यॉर तुला ती गोष्ट कळली
नवॉ धडॉ हिक्या मिळातॅ तिगाळा....
बग बाबाई आठोन येते गा ?

---

# मींगेल कॉपात तुमश्या फिल्यातसा आम्दा वराड

- **राजन डिमेलो, आगाय**

शीमाऑ हॉकरॉ मींगेलसा फील्यात. लगीन आलॅ. बाळटीम आन् कॉमसार होडला तॅ शीमानॅ त्या मींगेल कॉपातशी कतॅ विशेष अही सोय केली नोती. पन् आतॅ पॉराआ वराड आलॅ आन् पदरीनश्या अंगठीऑ प्रश्न हाय ना? ताहा आतॅ शीमाला तॅआ मींगेल कॉपातशी याद आली.

गॅलॉ वराडाआ आवतान द्या. मींगेल कॉपातनॅ बरॉस राग पाखडलॉ आन् मग अट टाकीली गा तॅला भरभक्कम आवतान पाय-
"होयरा काहा जाला इत् पासून तॅ करीक्रम का हाय ई जकला तॅत आला पाय, माला कतॅ आन् काहा यासा हाय ता पन जकला नीट हांगीला पाय"
मग का, शीमाला कय हांग्या पाया, गॅलॉ घारा आन लगेस कॉपातसा आमंत्रन लीविला.
तर मंडळी, शीमानॅ मींगेल कॉपातला त्या पॉराआ मींजॅस मींगेलश्या फील्यातश्या लग्नाआ आवतान काहा दीला ता वासा-

दादर टॅसनात तिला बगिला
तीओर तॅऑ लोभ जडलॉ
तॅनॅ निरप धाडलॉ,
पोरीला परवाडलॉ, होयरा जाला,
कॉ...कॉ... कोपात, तुमश्या, लाडक्या
फिल्यातसा आम्दा वराड आलॅ...!

हिनवारॅ हमदाव जायदॅ,
आयत्वारॅ शीटी पड्दॅ,
सुखी-दुखी कारिक्रम हॉयदॅ,
सुखी-दुखी करिक्रमा आयत्वारश्या हांज्या,
कॉ...कॉ... कॉपात तूमे,
कारिक्रमा यासा, कुमारीला घॅऑन...!

हुकुरवासा तळान निंगॅदॅ,
हिनवारसा हांज्या लागॅदॅ,
मामारा हाडी-सोळी जायदॅ
मामा येदॅ, मॉया बॅहॅदॅ,

कॉ...कॉ... कॉपात तूमे,
मॉयादों यासा, कुमारीला घॅऑन

करास मास्तरसॉ बैंड वाजॅदॅ,
कानाला गॉड आयक्या येदॅ,

आयत्वारॅ लवकर यासा
पुडॅ तूमॅ खुर्शित बॅहॅसा,
केक काप्या टेजवर सडॅसा,
पदरीनशी अंगठी, जन्माश्यों गाठी,
पदरीन-फिल्यातसा, ई आगळा नाता,
कुपा-याई शान हाय......

कॉ...कॉ... कोपात, तुमश्या, लाडक्या
फिल्यातसा आम्दा वराड आलॅ...!

# पृथ्वी संरक्षन काळाई गरज

▪ **ब्रिनल कुडेल , गास**

प्रिय बालगॉपाळांनो ,

पर्यावरन, वसुंधरा, पृथ्वी अहॅ शब्द तुमशा काना खूपदा आलॅ हायद्यात. या पृथ्वीआ रक्षन करेसा मिंजे नक्की करेसा का ? इ कय कॅल्या सुशॅ नाय. भगून मुद्दाम तुमश्याकरता एक कानी घॅऑन आले, तुमश्या हारक्यास ॲका बारक्या पॉरीइ, पन जिनॅ खूब बॉठा काम कॅला, नाव कॅला. इ गोष्ट आन कय मुद्दे तुमाला प्रेरनादायी ठरद्यात आन पुडॅ मदत करद्यात.

'वसुंधरा' जिआ नावातूस मुळात सुंदरा असताना तीइ अही अवस्था क? क तिआ रक्षनाऑ विषय उध्दभवतॅ ?

तिला आई , माता ,जननी अहॅ कोडे तरी नावे... तिआ पायाखाला स्वर्ग सुख... पन मंग तीइ अही हालत कय? जी कुहनॉही स्वार्थ न ठविता भरभरॉन देतॅ , तीआ बॉट धरॉन सलेसा हॉडॉन तिए आथ काप्या लागलेल्या समाजाला का बॉल्यासा ? याला संस्कृती तॅ बोलू शकात नाय, इ नक्कीस विकृती..........

"मानवजात व जीवसृष्टी खप्याशा मार्गोर हाय आन तुमी आमाला पैसो आन विकासायो कानी हांगात्या. तुमशी  हिम्मत कही ऑथॅ? तुमी आमाला फशीवित्या, ता आमी सहन करेशे नात."  - ग्रेटा थेनबर्ग (स्वीडिश पोरी)

ग्रेटाय  वरशॅ शब्द वाशिलॅ गा आंगाई आग ऑथॅ...

पर्यावरनाव  ऑथ अहलॅलॉ  ऱ्हास बगॉन  आपु नुसती प्रतिक्रियास  दॅनार  हाव ? गा पर्यावरना रक्षनाकरता कय  करनार हाव ता आपुन पुढशी कानी वासॉन ठरवॉ ..........

२०१८ सा इ  वादळ ,

इयत्ता ९वीत हिकनारी  ग्रेटा शाळीत जादो निगातॅ पन पॉशॅ मात्र नाय... ती तडाक जातॅ ती पार्लमेंट ( संसदेच्या ) इमारतीपुडॅ आन बॉठ्ठ्या अक्षरात एक फलक लिवितॅ, ‘पर्यावरन धॉक्यात, शाळा खॉक्यात ' (School Strike on climate crisis) आन ता धरॉन  शांतपनॅ

उबी रॅतॅ. हळूहळू यॅनारॅ, जानारे, तिला प्रश्न विसारत्यात आन तिआ मन्ना जॅला पटला तॉ तिआ जोडीला थांबातॅ. बगीता बगीता गर्दी वाडात जातॅ आन घोशनाव आवाजपन.... मंग अधिकारी बार येतॅत मंग ती त्यांना पर्यावरनाबद्दल प्रश्न विसारतॅ.

ऑडा  बळ आला कडने या पोरीत ????

तॅ ! ता तिला मिळाला तिआ  मास्तरनॅ हिकविलेल्या धड्यातनॅ! यूट्यूब वरशा व्हिडिओतनॅ, इंटरनेट आन वॅगवॅगळे  पुस्तके वासॉन... तिआ गायी पडलॅली माइती तिनॅ समाजापोत पॉश्व्यासा काम कॅला. विमान परवासामुळे प्रदूषनास मदत ऑथॅ भगून  विमान परवास बंद कॅलॉ आन तिआ कुटुंबियांनापन  बन कॅला. आंदोलन करॅसा ठरविला, प्रश्न विसारलॅ. जडतडे भाशने दिले, आपला मन्ना रोकठोकपनॅ जगाला हांगीला. कुनालापन अभिमान वाटॅदॅ आहा काम करताना ती आजपन दिखातॅ. पुडॅ टाइम या प्रसिद्ध मासिकानॅ तीऑ  ‘पर्सन ऑफ द इयर' भगून तिऑ सन्मान कॅलॉ.

एक शाळीतशी  पोरी संयुक्त राष्ट्रांआ सभेत आपलॅ विसार स्पष्टपने मांडू शकातॅ तॅ आपुन एकत्र आवाज उठविलॉ तर का – का साध्य हॉयदॅ ? प्रश्ना मुळालास आथ घालॉन तॉ होडविलॅलॉ बरॉ नाय गा? हवामान बदल, प्रदूषन, ग्लोबल वॉर्मिंग ॲ प्रश्न हॉडव्यास लागॅद्यात. वैज्ञानिक कार्बोन उत्सर्जन रॉखला गॅला नाय तॅ जग धॉक्यात येदॅ अहॉ इशारॉ माकून माकून देत आथ. एकून हवामानाओ प्रश्न गंभीर हॉत साल्ले, तॅत नवी नवी रॉगराई, आपत्ती याव हातभार हायुस. अह्या वेळी इ संकट रॉखन्याइ जबाबदारी इ आपली हाय. लडाई कय थांबली नाय पन तीइ सुरुवात स्पेन नॅ जाले. आतॅ तुमॅस ठरवा तुमालापन ग्रेटा हारका ‘ग्रेट‘ काम करॅसा हाय गा फक्त विडिओ गेम्स, खेळ आन इतर  गोष्टींत रमॅसा हाय.

यॅनाऱ्या पुड्शा पिढीला तॉडास स्वातंत्र्य, शुद्ध पानी, हवा आन अन्य नैसर्गिक गोष्टींऑ फायदॉ जालॉ पाय आहा वाटातॅ हायदे तॅ तर नक्कीस या कामाला आथ घाल्या लाग्यासॉ. प्रदूषन रॉखन्याकरता काटेकोर कायद्याआ पालन   जालास पाय. माआ  आथानॅ कुहनाही प्रदूषन हॉनार नाय आन कून तहा करतॅ हायदॅ तॅ मॅऑ विरोध करनार इ परत्येकाइ धारना अहली पाय. आवाज उठवने  इ गरजेआ हाय कारन या बारक्या बारक्या विरोधातनॅस बोठी सळवळ उबी रॅदॅ. 'झाडे लावा, झाडे जगवा' आहा जकलेस बॉलात्यात पन खऱ्या खुऱ्या आयुष्यात किती जन ताहा करत्यात?  ‘कोडे  झाडे लाविले आन कोडे जगविले?’  इ खरा मिंजे परत्येकानॅ सॉतालास विसऱ्या पाय. या प्रदूषनरुपी राक्षसाला आळॉ घालॅसॉ हायदे तर वृक्षसंवर्धन करना गरजेआ हाय.

आतेपोत बेताम शे  कायदॅ-नियम घालॉनपन  अस्वच्छता, रॉगराई कय कॅल्या आटोक्यात आली नाय. मुळात कोरोनानॅ "आरोग्य" इस खरी आपली दौलत इ हिकविला. मंग लाखो, करोडो रुपय कोडेपन उडविलॅ तरी, 'ज्याइ रोग प्रतिकार शक्ती जास्ती तॉस वासनार' आला गा ध्यानात.

खाला हांगिलेल्यो कय गोष्टी वसुंधरेला वाईटा विळख्यातनॅ वासवू शकात्यात :

१. दिवाळी-नाताळ- लग्नात आवाज-हवा प्रदूषन करनारे फटाके फोडना बन कॅला पाय.

२. लाकडाआ फर्निचर ऐवजी लोखांडी फर्निचरवर भर दिलॉ पाय.

३. तळ्यात-समुदरात-नदीत जा कय कसरा फेकीला जातॅ ता बन जाला पाय.

४. सूर्या ऊर्जेऑ (सौरऊर्जा) फायदो लॉकांपोत पोश्चिलॉ पाय आन त्याव वापर वाडविलॉ पाय.

५. गरजेपुरतास इंधनाऑ वापरॅसा.

६. इको - फ्रेंडली रंगांऑ वापर कराऑ.

७. भाटात रासायनिक खता जाग्योर गांडूळ नाते कम्पोष्ट खत  वापरॅसॉ.

८. पर्यावरन मित्र योजना व कृती आहा पॉरांना हिकविला पाय.

९. समाजसेवा इ मूल्य अंगीकारॉन पॉरांना योग्य तॅ धडॅ द्यावॅत.

इ मायमाता, धरती जाम सॉबातॅ. आपल्या पूर्वजाइ बगीली-वाडविली, आपुन बगीत्याव मंग आपल्या पुडशा  पिढीनॅ बगॅदो नाका गा?

हिरव्या रंगाइ  साडी नेहलेली इ पृथ्वी अहीस हिरवीगार सौभाग्यवती रेली पाय आहा जर वाटातॅ हायदॅ तॅ, "प्रदूषनाला सारा दूर , वसुंधरेच्या रक्षनाचा लावा सूर.............."

जक्ला तुम्शास आथा हाय पोरांदो...!!!!

ESTD.1918

BASSEIN CATHOLIC CO-OPERATIVE BANK LTD

(SCHEDULED BANK)




Call:9527441600 | Toll free no 1800 233 6000 / 1800 266 2407

Follow us at : | www.bccb.co.in